स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

**संदर्भ : रासेयो/२०२६-२७/९८** **अतिमहत्वाचे** **दि. २५/०६/२०२६**

**प्रति,**
**मा. प्राचार्य व संचालक**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम प्रस्ताव ऑनलाईन (Online) भरणे व रासेयो उपक्रम तात्काळ सुरू करण्याबाबत (सन २०२६-२७)**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सन २०१७-१८ वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजना कार्यप्रणाली पूर्णतः ऑनलाईन (Online) करण्यात आली असून सन २०२६-२७ वित्तीय वर्षाचे रासेयो एकक मागणी प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येत आहेत. रासेयो नियमित उपक्रम प्रस्ताव ऑनलाईन जमा करण्याची प्रक्रिया **दि. ३० जून, २०२६** पर्यंत आणि रासेयो विद्यार्थी नोंदणी **१५ जुलै, २०२६** पर्यंत पूर्ण करणे अनिवार्य आहे. रासेयो एकक मागणी प्रस्ताव ऑनलाईन भरण्याकरिता सोबतच्या Online Application User Mannual चे अवलोकन करावे. रासेयो एकक मान्यता प्रस्ताव ऑनलाईन जमा झाल्यानंतर महाविद्यालयातील रासेयो एककाने आपल्या कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या प्रमाणात मंजूर विद्यार्थी संख्येप्रमाणे रासेयो स्वयंसेवक शुल्काचे तयार झालेले चलन प्रिंट करून शुल्क RTGS/NEFT द्वारे मुदतीत भरावे. शुल्क भरल्यानंतरच महाविद्यालयास एकक मान्यता प्रस्तावाची प्रिंट घेण्याकरिता पर्याय उपलब्ध होईल. त्यानंतर प्रस्तावांवर मा.प्राचार्यांची स्वाक्षरी व महाविद्यालयाचा शिक्का घेऊन आपला प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी चलनासह अपलोड करणे गरजेचे आहे. तसेच रासेयो एकक विशेष शिबिरांचे **प्रस्ताव दि. २० ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६** दरम्यान भरावेत आणि प्रस्तावाची प्रिंट घेण्याकरिता पर्याय उपलब्ध झाल्यावर प्रस्तावांवर मा. प्राचार्यांची स्वाक्षरी व महाविद्यालयाचा शिक्का घेऊन आपला प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी पुन्हा अपलोड करावे.

दिलेल्या मुदतीत वरील प्रक्रिया पूर्ण करणाऱ्या रासेयो महाविद्यालयांनाच एकक मान्यता व कार्यक्रम अधिकारी मान्यतापत्र मा. प्राचार्य व संबधित कार्यक्रम अधिकारी (महाविद्यालयाच्या Teacher Profile मध्ये नमूद केलेल्या) यांच्या मेल आयडीवर आणि बी.ओ.डी. लॉगीनवर पाठविण्यात येईल. शासन अनुदानीत महाविद्यालयांना शासनामार्फत प्राप्त होणाऱ्या अनुदानानुसार त्यात्यावेळी महाविद्यालयाच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या झीरो बॅलन्स खात्यावर पी.एफ.एम.एस.द्वारे अनुदान वर्ग करण्यात येईल. त्यानुसार सदर अनुदान खर्च करण्याची प्रक्रीया संबधीत महाविद्यालयाने वेळेत पूर्ण करणे गरजेचे आहे.

तसेच स्वयंनिर्वाही एककाकरिता, एककानुसार एकूण मंजूर अनुदानापैकी प्रथम हप्ता अनुदान अनुदानीत एकका प्रमाणे महाविद्यालयाच्या रासेयो एकक खात्यावर RTGS/NEFT द्वारे वर्ग करण्यात येईल. आणि याकरिता महाविद्यालयाचे रासेयोचे स्वतंत्र बँक खाते मा. प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने असणे अनिवार्य आहे. या खात्याचा तपशिल BOD Online वर Finance Bank Details मध्ये असणे आवश्यक आहे.

एकक मागणीप्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात भरून रासेयो संकेतस्थळावर अपलोड केला नसल्यास संबंधित महाविद्यालयाच्या रासेयो एककाची/एककांची मान्यता अबाधित राहणार नाही.

सन २०२६-२७ ह्या वित्तीय वर्षात रासेयो योजनेमध्ये विद्यार्थी स्वयंसेवकांना प्रवेश देतांना महाराष्ट्र शासन, रासेयो विभाग शासननिर्णयाप्रमाणे एस.सी-१२% व एसटी-१०% व इतर ७८% प्रमाणात स्वयंसेवकांचे प्रवेश करणे अनिवार्य आहे. प्रवर्गनिहाय संख्येनुसारच शासनामार्फत/विद्यापीठामार्फत रासेयो महाविद्यालयांना नियमित कार्यक्रम व विशेष शिबिरांचे अनुदान उपलब्ध होणार आहे.

सन २०२२-२३ या वर्षापासून केंद्रशासनामार्फत रासेयो अनुदानामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. नियमित कार्यक्रमाकरिता प्रति विद्यार्थी रू. ३६०/- व विशेष शिबिराकरिता प्रति विद्यार्थी रू. ७००/- प्रमाणे रासेयो विभागामार्फत अनुदान अदा करण्यात येणार आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच केंद्र शासनाच्या पत्रानुसार शासनमान्य एकके १००,२०० या प्रमाणात असली पाहिजे असे निर्देशित करण्यात आले आहे. त्यामुळे ५०,१५०,२५० एकक असणाऱ्या महाविद्यालयांनी प्रस्ताव भरताना शेवटच्या मुद्यामध्ये एककामध्ये अपेक्षित वाढ अथवा कपात नमुद करणे आवश्यक आहे.रासेयो स्वयंसेवक ऑनलाईन नोंदणी, नियमित उपक्रम प्रस्ताव, विशेष शिबिरे प्रस्ताव आणि मासिक/त्रैमासिक अहवाल, व इतर माहिती Online पद्धतीनेच निर्धारित वेळेत भरून Upload करण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे.

| क्र. | विषय | | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | एकक व नियमित कार्यक्रम प्रस्ताव भरणे | | ३० जून, २०२६ पर्यंत |
| २ | विद्यापीठ पोर्टलवर स्वयंसेवक ऑनलाईन नोंदणी | | १५ ऑगस्ट, २०२६ पर्यंत |
| २ | रासेयो विशेष शिबिर प्रस्ताव भरणे | | २० ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ |
| ३ | विशेष शिबिरांतील स्वयंसेवक ऑनलाईन नोंदणी | | २० ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ |
| ४ | त्रैमासिक अहवाल भरणे | Quarter 2 | माहे एप्रिल, मे, जून (३० जुलै पर्यंत) २०२६ |
| | | Quarter 3 | माहे जुलै,ऑगस्ट,सप्टेंबर (५ ऑक्टोबर पर्यंत) २०२६ |
| | | Quarter 4 | माहे ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर (५ जानेवारी पर्यंत) २०२६ |
| | | Quarter 1 | माहे जानेवारी, फेब्रुवारी, मार्च (२० मार्च पर्यंत) २०२७ |
| ५ | इतर उपक्रमांचे अहवाल | | BOD लॉगीन मध्ये Govt. Other Reports – Add New करून परिपत्रकातील विषयानुसार अहवाल सादर करावा. |
| ६ | नियमित उपक्रम व विशेष शिबिरे लेखे सादर | | १५ फेब्रुवारी ते १० मार्च २०२७ |

सन २०२६-२७ या वर्षात विद्यापीठ रासेयो विभागाने निर्धारित व अग्रेषित केलेल्या रूपरेषेनुसार रासेयो उपक्रम राबवावेत. प्रत्येकी किमान १०० स्वयंसेवक संख्या असलेल्या दोन किंवा दोनपेक्षा जास्त एककांसाठी किमान एक महिला कार्यक्रम अधिकारी यांची नेमणूक करणे अत्यावश्यक आहे आणि कार्यक्रम अधिकारी नेमणूक करताना रासेयो संचलनालय, युवा व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक नियमावलीनुसार रासेयोच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी कार्यक्रम अधिकाऱ्यांकडे एन.सी.सी.,शारिरिक शिक्षण, विद्यार्थी कल्याण अधिकारी, IQAC व परीक्षा अथवा अन्य तत्सम कोणताही कार्यभार नसावा याची काटेकोर काळजी घ्यावी.

महाविद्यालयास एकक मंजूर करताना महाविद्यालयाचा मागील वर्षातील उपक्रमांचा तसेच, केलेले कार्य, परिपत्रकानुसार राबविलेले उपक्रम, तिमाही अहवाल, नियमित कार्यक्रम मंजूर विद्यार्थी संख्यापूर्ती, नियमित कार्यक्रम व लेखे सादरीकरण इत्यादींचा आढावा घेऊन एकक मंजूर करण्याबाबतचे सर्व अधिकार राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने राखून ठेवले आहेत. त्यानुसार अनुदानित अथवा स्वयंनिर्वाही एकक मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**
**राष्ट्रीय सेवा योजना**

**सोबत :** १. प्रत्येक महाविद्यालयास एककनिहाय स्वंतत्र कार्यक्रम अधिकारी मंजूर करण्यात येईल.
(उदा. २००/३०० रासेयो स्वयंसेवक एकक मंजूर असणाऱ्या महाविद्यालयास युनीट १ करिता १००, युनीट २ करिता १०० व युनिट ३ करिता १०० याप्रमाणे कार्यक्रम अधिकारी व एकक मंजूर करण्यात येईल.)